# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 50 ) 15th June 2025 ( No. of Pages 08 ) ( No : 10


# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये गोंधळयुक्त युगाची सुरुवात होणे टाळता येणे शक्य आहे ?


**- प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


**१.** सन २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचा जो नवा आकृतिबंध (५+३+३+४) अस्तित्वात येऊ घातलेला आहे त्यामध्ये प्राथमिक स्तरावर सुरुवात करतांनाच जबरदस्त गोंधळ झाल्याचे लक्षात आलेले आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी "**राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात सन २०२५-२६ पासून टप्प्या-टप्प्याने करणेबाबत**" या मथळ्याचा एक शासननिर्णय काढला (यापुढे उल्लेख "शासननिर्णय" असा) असून त्यामध्ये "**राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार यापुढे इयत्ता १ ली ते ५ वी साठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल**" अशी तरतूद समाविष्ट केली. वास्तविक याबावतीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (SCERT) अभ्यासक्रम आराखडा सुकाणू समितीने असा कोणताही निर्णय घेतला नाही अशी माहिती त्या समितीच्या सदस्यांनी व अध्यक्षांनी जाहिरपणे वृत्तपत्रांना दिली. "राज्यात पहिलीपासून हिंदी शिकविण्यासाठी स्वतंत्र शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार नाही तसेच अन्य भारतीय भाषा उपलब्ध करण्यासाठी स्वतंत्र शिक्षकांची नियुक्ती करणे सध्या शक्य नाही." असे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक श्री.राहूल रेखावार यांनी जाहिरपणे सांगितले. एकूण काय तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करतांना निरनिराळ्या स्तरावर किती प्रकारचा गोंधळ होऊ घातलेला आहे याची चुणूक या हिंदी विषयाच्या गोंधळाने दिसून आली आहे. पुढच्या २४ तासात तो निर्णय मागे घेण्यात आल्याने या गोंधळावर कळसच चढविला. चुकीचा शासननिर्णय दुरुस्त करण्यासाठी नवा शासननिर्णयच काढावा लागतो हे शासनात कोणाला तरी कळेल असे आपण गृहीत धरू. सध्यातरी निर्णय मागे घेण्यात आला ही बातमीच आहे.

**२.** वस्तुतः अशा प्रकारची सक्ती करणारी कोणतीही तरतूद किंवा शिफारस २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आलेली नाही. भारताच्या घटनेतील तरतुदी विविध प्रांतातील लोकांच्या भावना व आकांक्षा तसेच राष्ट्रीय ऐक्याची भावना (to promote National Unity) वाढीस लागावी हा विचार समोर ठेवून या NEP च्या परिच्छेद ४.१३ मध्ये पुढीलप्रमाणे शिफारस करण्यात आलेली आहे.:-

"4.13. The three-language formula will continue to be implemented while keeping in mind the Constitutional provisions, aspirations of the people, regions, and the Union, and the need to promote multilingualism as well as promote national unity."

मातृभाषेचे महत्त्वसुद्धा NEP च्या परिच्छेद ४.११ मध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले आहे. :-

"4.11. It is well understood that young children learn and grasp nontrivial concepts more quickly in their home language/ mother tongue. Home language is usually the same language as the mother tongue or that which is spoken by local communities."

**३.** हा सर्व गोंधळ लक्षात घेता यातून आता अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. **एक म्हणजे** घटनेतील कोणत्या तरतुदींचा वापर करून कर्त्या पुरुषांनी हा गोंधळ घातलेला आहे. **दुसरे असे की,** घटनेतील तरतुदींचा वापर करून कोणते उपविधान जन्मास घालण्यात आलेले आहे. **तिसरे असे की,** विधिविधानाने किंवा उपविधानाने कोणती प्राधिकरणे स्थापित केलेली आहेत? **चौथे असे की,** या प्राधिकरणांना त्यांच्या जन्मदात्यांनी उपविधान निर्मितीचे कोणकोणते प्रकार उपलब्ध करून दिलेले आहेत. **पाचवे असे की,** उपविधानाची निर्मिती करण्याचे अधिकार कोणत्या प्राधिकरणांना किंवा उप प्राधिकरणांना देण्यात आलेले आहेत. या प्रश्नांची उत्तरे मिळाली म्हणजे या गोंधळाचे स्वरूप लक्षात येईल. अभ्यासक्रम आराखडा समिती तसेच सुकाणू समिती, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी आपल्या जन्मदात्यांच्या शक्तींची आठवण केली तर आपल्याला कोणत्याही शक्ती प्रदान करण्यात आलेल्या नाहीत हे त्यांच्या लक्षात येईल.

**४.** अधिकारपद धारण करून अधिकार वापरणाऱ्यांना अधिकार वापरून झाल्यावर हे निर्णय घेण्याचा अधिकार तुम्हाला नव्हताच, एवढेसुद्धा कळविण्यात आले नाही व त्यांच्या त्या मूळ निर्णयामध्ये बदल करण्यात आला. ज्यांनी बदल केला त्यांनासुद्धा तसे करण्याचा अधिकार कायद्याने दिलेला नाही, हे लक्षात आल्यामुळे काढलेला निर्णय सुद्धा २४ तासात मागे घेण्यात आला. ज्यांनी तो मागे घेतला ते कोण आहेत व त्यांना हा अधिकार NEP मधील कोणत्या कलमान्वये देण्यात आलेला आहे हे अजूनही लोकांना कळलेले नाही. त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा 'कचरा' करून टाकण्यात आला, याबद्दल त्या अभ्यासक्रम आराखडा समितीला किंवा सुकाणू समितीला कोणताही विशाद वाटत नाही. आपला एवढा 'पालापाचोळा' होत आहे याचे कारण आपली निर्मिती ही विधिमय नाही व आपले अधिकारसुद्धा आपल्याला विधिविधानाने किंवा उपविधानाने प्रदान केलेले नाहीत हे त्या समितीच्या अजूनही लक्षात येत नाही हे या गोंधळाचे खरे स्वरूप आहे.

**५.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर जो गोंधळ झाला तो कसा झाला? व कशामुळे झाला? याची माहिती वर दिलेली आहे. आता पुढील परिच्छेदातून उच्च शिक्षणाच्या बाबतीत काय

**कोणत्या कलमान्वये दिलेल्या कोणत्या अधिकारांन्वये आपल्याला हा विशेष आनंद होत आहे हे त्यांनी नमूद केलेले नाही. त्यामुळेच पुढे कुणी तरी त्यांनी शिफारस केलेली नसतांना त्यांच्या नावावर प्राथमिक शिक्षणात हिंदी सक्तीची करून टाकणारा शासननिर्णय काढला. त्यानंतर आम्ही अशी शिफारस केलेली नाही. ''तो मी नव्हेच'' असे खुलासे करीत विशेष आनंद झालेले संचालक वृत्तपत्रांच्या कार्यालयात फिरत होते.** *(परिच्छेद १६ पहा)*

संभाव्य गोंधळ होऊ घातलेला आहे याची माहिती नमूद करणे आवश्यक वाटते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची बांधणी करणाऱ्या **सर्व स्तरावरील राज्यकर्त्यांना शिक्षण आयोगाच्या अहवालाची निश्चितच माहिती आहे असे दिसून येते.** कारण दिनांक १६ एप्रिल २०२५ च्या त्यांच्या शासननिर्णयाच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये "**शिक्षण आयोगाने देशातील शिक्षणामध्ये अनेक सुधारणा घडवून आणलेल्या आहेत**" असा उल्लेख आहे. २०२० चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणच आयोगाने नमूद केलेल्या मुलभूत सिद्धांताच्या विरोधात आहे. शिक्षण आयोगाच्या अहवालामध्ये कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पुनर्रचना करतांना उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा उत्तम उपयोग करून घेणे हा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून सांगितलेला आहे. या साधनसामग्रीचा आपण किती उत्तम उपयोग करून घेतो व त्या साधनसामग्रीमध्ये किती भर घालतो ही गोष्ट सर्वात महत्त्वाची मानलेली आहे. शिक्षण आयोगाच्या अहवालाच्या परिच्छेद २.०२ मध्ये ही बाब पुढील शब्दात मांडलेली आहे. :-

"But the **utilization of available facilities** is probably the most significant of all elements on which standards depend. For any self-accelerating process of development, it is essential in the first place to **improve efficiency at the level of the existing inputs** and to add more inputs only if they are crucial to the process. An increase of inputs assumes significance only at a later stage."

**शैक्षणिक आकृतिबंधाची रचना (structure), कालावधी (duration) यापेक्षा उपलब्ध साधनसामग्रीचा उत्तम उपयोग करून घेणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट शिक्षण आयोगाच्या अहवालामध्ये मांडलेली आहे.**

**६.** सन २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे सर्व परिच्छेद काळजीपूर्वक वाचले तर या महत्त्वपूर्ण बाबींकडे या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे असे दिसून येते. उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीमध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वर्गखोल्या, ग्रंथालये व प्रयोगशाळा यांचा समावेश करणे याला शिक्षण आयोगाने आपल्या अहवालात महत्त्व दिलेले आहे. कारण ही साधनसामग्री अनेक दिवसांच्या नव्हे तर अनेक पिढ्यांच्या मेहनतीने उभी केली जाते. ती एका दिवसात उभी करण्यासारखी गोष्ट नाही. एखादा विषय सक्तीचा करण्याचा निर्णय किंवा कला, वाणिज्य या विद्याशाखांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याला पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र हे विषय सुद्धा घेता येतील असा निर्णय एका दिवसात घेता येतो. पण ही साधनसामग्री एका दिवसात उभी करता येत नाही. **सबंध देशासाठी जेव्हा आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवित आहोत तेव्हा निरनिराळ्या राज्यांत या साधनसामग्रीच्या उपलब्धतेची काय अवस्था आहे या विषयीच्या अभ्यासाचा संपूर्णपणे अभाव या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात दिसून येतो.** हे राष्ट्रीय धोरण अंमलात आणतांना आज उपलब्ध असलेला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग कसा उपयोगात आणला जाईल व तो कर्मचारी वर्ग कमी पडत असेल तर त्यामध्ये भर टाकण्याची काय व्यवस्था करण्यात आलेली आहे तसेच तो अतिरिक्त होणार असेल तर काय? याबाबत कोणताही उल्लेख या शैक्षणिक धोरणात दिसून येत नाही.

**७.** या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिच्छेद २४.४ मध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेऊन पुढीलप्रमाणे नवनवीन उपक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे. :-

"(a) Pilot studies for online education (b) Digital infrastructure (c) Online teaching platform and tools (d) Content creation, digital repository, and dissemination (e) Addressing the digital divide (f) Virtual Labs (g) Training and incentives for teachers (h) Online assessment and examinations (i) Blended models of learning (j) Laying down standards." **मात्र त्याबाबतीत कर्मचारी वर्गाची व इतर साधनसामग्रीची काय व्यवस्था करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे याविषयीचा कोणताही उल्लेख या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये नाही.** हे सर्व करण्यासाठी कोणत्याही साधनसामग्रीची किंवा मनुष्यबळाची आवश्यकता असणार नाही असे हिम्मतबाज विधानसुद्धा या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कोठेही दिसून येत नाही.

**८. घटनात्मक तरतुदींच्या स्थापित स्थितीचे आकलन न करता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची मांडणी करण्यात आलेली आहे हे स्पष्टपणे दिसून येते.** त्यामुळेच भारतीय संविधानाने उच्च शिक्षणक्षेत्रातील कोणते विषय केंद्रशासनाच्या ताब्यात दिले आहे, कोणते विषय राज्यशासनाच्या ताब्यात दिले आहे, कोणते विषय समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट केलेले आहे याबाबतची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

**(A) केंद्रसूची :** भारतीय संविधान अस्तित्वात आले त्या दिवसापासून "**Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions.**" हा विषय घटनेच्या सातव्या परिशिष्टातील केंद्रसूचीमध्ये समाविष्ट आहे. (Entry 66 in the Union List i.e. List I of Seventh Schedule of the Constitution of India.) केंद्र सूचित असलेल्या विषयाबाबत विधिविधानाचे अधिकार हे संसदेलाच (म्हणजे केंद्रशासनाला) असतील अशी घटनेच्या कलम २४६ मध्ये तरतूद आहे. संविधानाने दिलेल्या या अधिकाराचा वापर करून केंद्राने "**विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६**" हा कायदा पारित केला. या कायद्याच्या २६ व्या कलमान्वये रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला प्रदान करण्यात आलेले आहेत.

**(B) समवर्ती सूची :** "Education, including technical education, medical education and universities," हा विषय भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टात समवर्ती सूची या तिसऱ्या सूचीमध्ये २५ व्या क्रमांकावर समाविष्ट आहे. समवर्ती सूचीतील विषयावर कायदे करण्याचा व कारभार करण्याचा अधिकार केंद्रशासन व राज्यशासन या दोघांनाही असेल, मात्र दोहोंमध्ये विसंगती निर्माण झाल्यास संविधानाच्या खंड २५४ मधील व्यवस्था लागू होईल. ती अशी की, याबाबतीत केंद्राच्या आणि राज्याच्या तरतुदीमध्ये विरोध निर्माण झाल्यास केंद्राच्या तरतुदी वरचढ ठरतील व विरोधाभासाच्या प्रमाणात राज्याने केलेल्या तरतुदी निष्प्रभ होतील.

**(C) राज्यसूची :** भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टामध्ये दुसरी यादी ही राज्यसूची (State List) या मथळ्याने समाविष्ट असून संविधानाच्या कलम २४६ मध्ये राज्यसूचीत समाविष्ट असलेल्या विषयावर विधिविधानाचा व प्रशासनाचा पूर्ण अधिकार राज्यशासनाला असेल असे नमूद आहे. राज्यसूचीत क्रमांक ३२ वर पुढीलप्रमाणे विषय आहे. :- "32. Incorporation, regulation and winding up of ..... universities;"

**९. घटक राज्यांना याबाबतीत काहीच अधिकार नाहीत असे गृहीत धरून राष्ट्रीय धोरणाची बांधणी करण्यात आलेली आहे.** समवर्ती सूचीमधील विषयांवर कायदा करण्याचा अधिकार राज्यांनासुद्धा आहे. केंद्रशासनाने घटनेतील अधिकारांचा वापर करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलात आणण्यासाठी कोणताही कायदा अजून केलेला नाही व त्यामुळे राज्यसरकार याबाबतीत जर काही कायदा करील तर त्याची अंमलबजावणी करावी लागेल ही गोष्ट स्पष्ट आहे. राज्यसूचीमध्ये असलेल्या विषयावर फक्त राज्यशासनाचे नियंत्रण राहिल ही गोष्टसुद्धा स्पष्ट आहे. **या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची बांधणी करीत असताना घटनात्मक तरतुदींनी राज्यांना बहाल केलेल्या अधिकारांचा अजिबात विचार केलेला नाही हे स्पष्टपणे दिसून येते.**

**१०.** भारतीय संविधानातील ह्या तरतुदी लक्षात घेता उच्च शिक्षणक्षेत्रातील अधिकाराच्या वापराबाबत केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यामध्ये तीव्र संघर्ष होतील असे स्पष्टपणे दिसून येते. याबाबतीत संविधानातील तरतुदींचा अर्थ लावून अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मा.सर्वोच्च न्यायालयाचा असल्यामुळे हे संघर्ष अनेक दिवस चालतील असेही दिसून येते. यापूर्वी केंद्रशासनाने केंद्रसूचीने प्रदान केलेले अधिकार वापरून विद्यापीठ अनुदान आयोग कायदा १९५६ हा कायदा केला. त्या कायद्याच्या २६ व्या कलमाने रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला प्राप्त झालेले आहेत. हे रेग्युलेशन व त्या रेग्युलेशन अंतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या 'गाईडलाईन्स' ह्या बंधनकारक असतील असे मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेले आहे. पण आता विद्यापीठ अनुदान आयोगच नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे अस्तित्वहीन होणार असल्यामुळे साऱ्याच बाबी ह्या नव्याने सुरू होतील व त्यावरील संघर्ष बऱ्याच काळ चालेल असे स्पष्टपणे दिसून येते.

***सक्ती करण्याची शक्ती कायद्याने दिलेली असतांना ज्यांना Tight करता आले नाही ते Light but Tight च्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या काळात काय करतील याची कल्पना करता येते.***

*(परिच्छेद १७ पहा)*

**१०.१** केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामध्ये घटनात्मक अधिकारांचा वापर करण्यावरून प्रत्यक्षात संघर्ष सुरू झालेला असून शुक्रवार, दिनांक ९ मे २०२५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयाची बातमी पुढीलप्रमाणे :- "The Supreme Court on Friday dismissed a petition filed by BJP leader and lawyer G.S. Mani, which asked for the implementation of the three-language formula under the National Education Policy (NEP) 2020 in Tamil Nadu, Kerala, and West Bengal." पण येथे हा संघर्ष संपलेला नाही. उलट याच निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने "7. We do not propose to examine this issue in this writ petition filed under Article 32 of the Constitution." असे म्हटलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यात केंद्र व राज्य सरकारमध्ये उद्भवणाऱ्या संघर्षाचे हे एक उदाहरण आहे. लहान लहान मुद्यांवरून हे संघर्ष वाढत जातील व सर्वोच्च न्यायालयाकडून त्या प्रत्येक बाबतीत निर्वचन (Interpretation) हाती पडण्यास अनेक वर्षांचा सुद्धा विलंब लागू शकतो. विलंबाच्या काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची 'कोणी गोविंद घ्या कोणी गोपाळ घ्या' अशी स्थिती होऊ शकते हे लक्षात घेतले पाहिजे. मा.सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय **सहपत्र : एक** म्हणून सोबत प्रसृत केलेला आहे.

**११.** याबाबतीत अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी केंद्राला एक निवेदन (84/25) सादर केले आहे. हे निवेदन मुख्यत्वे ड्राफ्ट रेग्युलेशनबाबत प्रतिक्रिया व्यक्त करणारे निवेदन आहे. त्या निवेदनाच्या परिच्छेद १० मध्ये अतिशय उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :-

"i. the various state governments have enacted various acts for the formation of different universities in their state. Many of these acts are university-specific acts and are unique for each university.

ii. The act for each University specifies the statutes for the University. It also gives in detail the procedure to be followed for the appointment of the Vice Chancellor in the University.

iii. The State Governments have their nominee in the panel for appointment of the Vice Chancellor. The proposed regulations do not permit the State Government to appoint their nominee on the selection committee for the Governor.

iv. The proposed UGC regulations will arrogate the powers of the State Governments to have a say in the appointment of the Vice Chancellor and the functioning of the Universities.

v. The proposed regulations go against the principles of federal democracy outlined in the Indian Constitution. These regulations will undermine the autonomy of state institutions."

अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने केलेल्या ह्या सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये आवश्यक ते बदल केल्यास संभाव्य गोंधळामुळे उच्च शिक्षण क्षेत्रावर येणारे संभाव्य संकट टळू शकेल.

**१२. आर्थिक तरतुदींच्या संदर्भात या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अजिबात विचार करण्यात आलेला नाही हे स्पष्टपणे दिसून येते.** हे शैक्षणिक धोरण अंमलात आणतांना कोणताही जादा खर्च येणार नाही असे गृहित धरलेले आहे. त्यामुळेच याबाबतचा घटनात्मक इतिहास तपासणे गरजेचे झालेले आहे. सन १९५६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोग कायदा करण्यात आला. तत्पूर्वी

*( सहपत्र एक : परिच्छेद १०.१ पहा )*

ITEM NO.7 COURT NO.13 SECTION PIL-W

# SUPREME COURT OF INDIA

## Record of Proceedings : Writ Petition(Civil) No.260/2025

G.S. MANI Petitioner(s) **VERSUS** GOVERNMENT OF TAMIL NADU & ORS.Respondent(s)

**For Admission : Date : 09-05-2025**

This petition was called on for hearing today.

**CORAM**

**HON'BLE MR. JUSTICE J.B. PARDIWALA : HON'BLE MR. JUSTICE R. MAHADEVAN**

For Petitioner(s) : Petitioner-in-person For Respondent(s) :

UPON hearing the counsel the Court made the following

**ORDER**

**1.** Application for seeking permission to appear and argue in person is allowed.

**2.** The petitioner appearing-in-person has invoked jurisdiction of this Court under Article 32 of the Constitution praying for the following reliefs:-

*"a) Issue an appropriate Writ or Order especially in the nature of Writ of Certiorari Mandamus calling for the records of 1st to 5th Respondents/Central and State Governments pertaining to the National Education Policy 2020 of the 4th Respondent, UOI and direct the 1st to 3rd respondents, States Governments to implement the said National Education Policy 2020 and sign the MOU with the 5th Respondent, Union Education Ministry and ensure the fundamental rights of right to education of needy children"*

**3.** Whether the States should adopt the National Education Policy, 2020 or not, is a vexed issue.

**4.** The Supreme Court through Article 32 of the Constitution can issue directives to ensure that the fundamental rights of the citizens are protected.

**5.** It cannot directly compel a State to adopt a policy like the National Education Policy, 2020.

**6.** The Court may, however intervene if a State's action or inaction related to the National Education Policy violates any fundamental rights or any other legal rights.

**7.** We do not propose to examine this issue in this writ petition filed under Article 32 of the Constitution.

**8.** We believe that the petitioner has nothing to do with the cause he proposes to espouse. Although he may be from the State of Tamil Nadu yet on his own admission he is now residing in New Delhi.

**9.** The main issue may be examined by this Court in an appropriate proceedings but at least not in this particular petition.

**10.** In such circumstance, this petition stands dismissed.

**11.** Pending application(s), if any, stand disposed of.

(CHANDRESH) (POOJA SHARMA)
ASTT. REGISTRAR-cum-PS COURT MASTER (NSH)

***या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची बांधणी करीत असताना घटनात्मक तरतुदींनी राज्यांना बहाल केलेल्या अधिकारांचा अजिबात विचार केलेला नाही हे स्पष्टपणे दिसून येते.***

*(परिच्छेद ९ पहा)*

याबाबतचे विधेयक संसदेत सादर करतांना जे उद्देश व कारणांचे निवेदन देशाचे शिक्षण मंत्री श्री. मौलाना आझाद यांनी दिनांक २४ सप्टेंबर १९५४ रोजी संसदेला सादर केले. त्यामध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे :-

"The Constitution of India vests Parliament with **exclusive authority in regard to coordination and determination of the standard in institution for higher education** or research and scientific and technical institutions. It is obvious that neither coordination nor determination of standards is possible unless the central government has some voice in the determination of standards of teaching and examination in universities, both old and new."

विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा सुनिश्चित करणे व उच्च शिक्षण संस्थामध्ये समन्वय ठेवणे हा विषय घटनेने केंद्रशासनाकडे सोपविला असला तरी ते कार्य पार पाडण्यासाठी तपशीलवार तरतुदी असलेला कायदा अस्तित्वात असणे आवश्यक आहे. अशी ही मांडणी आहे.

**१२.१** पुढे हे विधेयक संसदेच्या उभय सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. समितीने त्याबाबतचा अहवाल २६ जुलै १९५५ रोजी अंतिम केला. या अहवालामध्ये समितीने स्पष्टपणे असे नमूद केले होते की, **"युनिर्व्हसिटी एज्युकेशन हा राज्यसूचीतील विषय असल्यामुळे विद्यापीठीय व संलग्न महाविद्यालयांबाबतची आर्थिक जबाबदारी राज्यशासनाने पार पाडावी व केंद्रशासनाने याबाबत कोणताही भार आपल्याकडे ओढून घेऊ नये."** या समितीने जेव्हा ही शिफारस केली त्या वेळेला तो विषय पूर्णपणे राज्यसरकारच्या अखत्यारीत म्हणजे राज्यसूचीत होता हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की, आज तो विषय राज्यसूचीमध्ये नाही तर समवर्ती सूचीमध्ये आलेला आहे.

**१२.२** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीत दर्जा निर्धारण करणे व त्या संस्थांमध्ये समन्वय ठेवणे हा विषय केंद्रशासनाकडे असल्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पातळीवर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेण्यांबाबत सातत्याने विचार होत राहिला व त्याबाबत शिफारशी १९५५ पासून होत आहेत. हुमायून कबीर यांच्या कमिटीने या विषयाला सर्वात जास्त प्राधान्य दिले पाहिजे अशी शिफारस करून त्याबाबतीत अनेक उपाययोजना सुचविल्या होत्या. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सुधारित वेतनश्रेण्या हा महत्त्वाचा विषय असल्याचे नमूद करून त्याबाबत शिफारशी करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने डॉ. ए. एल. मुदलीयार, जॉन मथाई आणि एन. के. सिद्धांत या तिघांची एक कमिटी नेमली होती. याबाबत व्यावहारिक उपाययोजना सुचविणे असे काम त्या कमिटीला देण्यात आलेले होते. त्या कमिटीच्या शिफारशीनंतर **वेतन सुधारणेच्या संदर्भात करावयाच्या जादा खर्चाचा ८० टक्के भार हा विद्यापीठ अनुदान आयोगाने/केंद्राने सहन करावा व २० टक्के भार त्या त्या राज्यसरकारांनी सहन करावा ही शिफारस मान्य झाली व तेव्हापासून तर सहाव्या वेतन आयोगापर्यंत तीच स्थिती प्रत्यक्ष अंमलात राहिली.** सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीच्या वेळेला केंद्राचे अर्थसहाय्य ८० टक्क्यांवरून ५० टक्के करण्यात आले. **आज तर या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये एक टक्कासुद्धा आर्थिक जबाबदारी उचलण्याचा उल्लेख नाही.**

**१२.३ या नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत सर्व अधिकार हे केंद्रशासनालाच आहेत असे गृहीत धरून हे धोरण ठरविण्यात आलेले आहे.** त्यामुळे अनेक राज्यसरकारे त्याविरोधात आवाज उठवितील. तशी सुरुवात झालेली आहे. त्यातून पुढे **"सर्व जर तुम्हीच ठरविणार आहात तर मग आम्ही एक रुपयाचासुद्धा आर्थिक भार उचलणार नाही" अशी भूमिका अनेक राज्यांकडून समोर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याबाबतीत या राष्ट्रीय धोरणाने कोणताही विचार केलेला नाही हे खेदजनक होय.**

**१३.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने पुनर्रचनेचा जो आराखडा मांडलेला आहे त्यानुसार प्राथमिक पासून तर विद्यापीठापर्यंतच्या सर्व स्तरावर एकदम एक दोन वर्षात एकसमयावच्छेदेकरून अंमलबजावणी करण्यात यावी असे त्यांनी गृहित धरलेले आहे. ही गोष्ट **राष्ट्रीय स्तरावर शिक्षण आयोगाच्या अहवालाने स्थापित केलेल्या सिद्धांताच्या विरोधात आहे.** शिक्षण आयोगाच्या अहवालामध्ये टप्प्या टप्प्याने (phased programme) १० वर्षात अंमलबजावणी सुचविली आहे. विद्यापीठ स्तरावर पूनर्रचना करतांना कोणकोणत्या जबाबदाऱ्या कोणाकोणाला पार पाडाव्या लागतील याच्या स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. शिक्षण आयोगाच्या अहवालातील परिच्छेद २.२३ पुढीलप्रमाणे आहे. :-

"2.23 The following measures may be adopted to bring about this transfer :

(1) The responsibility for transferring all pre-university or intermediate work from the universities and affiliated colleges should be placed on the University Grants Commission, **which should be asked to prepare a phased programme to be spread over not more than ten years for the purpose.** A beginning should be made with the universities and the postgraduate colleges which should be required to shed this work as soon as practicable. This policy should then be extended to degree colleges, where the enrolments at this stage should be frozen at a certain time, after which the colleges would be required to taper them off as their enrolments at the undergraduate stage begin to grow. **Beyond the fourth plan, the opening of new pre-university or intermediate classes in the universities and affiliated colleges should not be permitted.** "

**प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत टप्प्याटप्प्याने पुनर्रचनेचा कार्यक्रम यापूर्वी प्रमाणे न राबविता सर्व स्तरावर एकाच वेळी वर्षा दोन वर्षात हा पुनर्रचनेचा कार्यक्रम राबविण्याचे काय दुष्परिणाम होतील याची कल्पनासुद्धा NEP मध्ये दिसून येत नाही.**

**१३.१ शैक्षणिक आकृतिबंधाची पुनर्रचना होतांना काय हाल होतात? याचा अनुभव यापूर्वी महाराष्ट्राने एकदा घेतलेला आहे. १०+२+३ हा आकृतिबंध**

***शैक्षणिक आकृतिबंधाची पुनर्रचना होतांना काय हाल होतात? याचा अनुभव यापूर्वी महाराष्ट्राने एकदा घेतलेला आहे. १०+२+३ हा आकृतिबंध १९७५ मध्ये महाविद्यालयांच्या दारात येऊन ठेपला. महाविद्यालयात फक्त +३ चेच वर्ग राहणार असल्यामुळे मोठ्या प्रमाणात महाविद्यालयीन शिक्षकांची कपात होणार हे स्पष्ट झाले. उद्या जर हे शिक्षक कन्फर्म झाले तर त्यांना काढून टाकण्यात अडचण येऊ नये म्हणून भारतामध्ये कोणत्याही राज्य सरकारने उचलले नसेल असे क्रांतिकारक पाऊल म्हणून महाराष्ट्र शासनाच्या १९७३ च्या अधिनियम क्रमांक*** **(Maharashtra College Teachers (Temporary postponement of confirmation Act, 1973 Maharashtra Act No. 33 of 1973)** ***३३ चे सांगता येईल.***

*(परिच्छेद १३.१ पहा)*

**१९७५ मध्ये महाविद्यालयांच्या दारात येऊन ठेपला. महाविद्यालयात फक्त +३ चेच वर्ग राहणार असल्यामुळे मोठ्या प्रमाणात महाविद्यालयीन शिक्षकांची कपात होणार हे स्पष्ट झाले. उद्या जर हे शिक्षक कन्फर्म झाले तर त्यांना काढून टाकण्यात अडचण येऊ नये म्हणून भारतामध्ये कोणत्याही राज्य सरकारने उचलले नसेल असे क्रांतिकारक पाऊल म्हणून महाराष्ट्र शासनाच्या १९७३ च्या अधिनियम क्रमांक (Maharashtra College Teachers (Temporary postponement of confirmation Act, 1973 Maharashtra Act No. 33 of 1973) ३३ चे सांगता येईल.** सुरूवातीला वटहुकूम काढून हा कायदा प्रख्यापित करण्यात आला होता. (Maharashtra Ordinance No. IX of 1973) "३१ मे १९७३ या दिवसापासून तर राज्य सरकार पुढे राजपत्रात जाहीर करील त्या तारेखपर्यंत कोणत्याही प्राध्यापकाला सेवेमध्ये कायम (confirm) केले जाणार नाही इतकेच नव्हे तर एक महिन्याचा पगार किंवा एक महिन्याची नोटीस देऊन व्यवस्थापक केव्हाही त्याला काढून टाकू शकतील." असे या कायद्याचे थोडक्यात स्वरूप सांगता येईल. हा कायदा का म्हणून करण्यात आला याविषयीची कारण मीमांसा विधयेकाला जोडण्यात आलेल्या हेतू विवरण पत्रामध्ये (Statement of Objects and Reasons) दिसून येते. ९ ऑगस्ट १९७३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या भाग ५ मध्ये पृष्ठ २०८ वर प्रसिद्ध झालेल्या या हेतूपत्रकाचा थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे - "काही विद्यापीठांमध्ये परिनियमानुसार प्राध्यापक दोन वर्षांनी आपोआप 'कन्फर्म' होतात. १०+ २+३ च्या आकृतिबंधामुळे काही प्राध्यापक हे महाविद्यालयात जादा होतील. त्यांना एकतर सेवेतून काढून द्यावे लागेल किंवा 'हायर सेकंडरी'कडे शिक्षक म्हणून जावे लागेल. हे काम सुकर व्हावे म्हणून हा कायदा करण्यात आला आहे."

**१३.२** महाविद्यालयात फक्त तीन वर्ग राहणार या आकृतिबंधातील रचनेमुळे महाराष्ट्रातील उच्च शिक्षणक्षेत्रात खळबळ उडवून दिली. इकडे दोन वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पद्धतीने शैक्षणिक पुनर्रचना झाली तर कशी दाणादाण होते याचा नमूना त्यावेळेच्या नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये पहायला मिळाला. डॉ.लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या सेकंडरी एज्युकेशन कमिशनने ११+२+२ चा आकृतिबंध टाकून द्यावा व त्याऐवजी १०+१+३ किंवा ११+३ ची व्यवस्था स्वीकारावी, अशी शिफारस केली. त्यावेळच्या मध्यप्रदेश सरकारने हा बदल स्वीकारला व क्रमशः १९५८ मध्ये मुदलीयार पॅटर्न महाविद्यालयामध्ये येऊन धडकला व त्यामुळे विदर्भातील आकृतिबंध १४ वर्षांचा झाला व तसा तो १९७५ पर्यंत टिकलाही. उलट त्यावेळच्या मुंबई सरकारने मुदलीयार पॅटर्न स्वीकारला नाही व त्यामुळे मुंबई, पुणे, कोल्हापूर विद्यापीठांतून मूळ १५ वर्षांचा आकृतिबंध १९७५ पावेतो अबाधित राहिला. कोठारी कमिशनचा अहवाल आला आणि १०+२+३ ची अंमलबजावणी सुरू झाली व १९७४-१९७५ च्या दरम्यान हा आकृतिबंध महाविद्यालयाच्या दारात येऊन ठेपला. अधिक दोनचे वर्ग या नव्या आकृतिबंधानुसार विद्यालयातून राहावे, अशी कोठारी कमिशनने शिफारस केली होती. आकृतीबंधाची ही जी वाटचाल महाराष्ट्रामध्ये सुरू झाली त्याचा दुहेरी फटका महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्थेला बसला. विशेष कारणांमुळे विदर्भात बसलेला हा फटका तिहेरी स्वरूपाचा होता. या तिहेरी फटक्यातील **पहिला फटका** म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या काही काळासाठी फार मोठ्या प्रमाणात कमी झाली. **दुसरा फटका** म्हणजे काही काळासाठी का होईना महाविद्यालयातून शेकडो शिक्षक अतिरिक्त होणार. ही शक्यता लक्षात घेऊन त्यांना काढून टाकणे पुढे कठीण जाऊ नये म्हणून १९७३ मध्येच महाराष्ट्राच्या राज्यपालांनी एक वटहुकूम (Ordinance No. IX of 1973) काढून कोणत्याही महाविद्यालयीन शिक्षकाला सेवेत कायम (Confirm) करू नये असा कायदाच केला होता. **तिसरा व सर्वात मोठा फटका** म्हणजे सर्वच महाविद्यालयातील वेतन वितरण व्यवस्था पार कोसळून पडली होती. खरे म्हणजे याबाबत कोणतीही व्यवस्थाच अस्तित्वात नव्हती. विद्यार्थ्यांच्या फी मधून सारे भागवायचे. तुट पडल्यास तुटीच्या काही प्रमाणात अनुदान मिळत असे. त्यावेळेच्या 'डेफिसिट ग्रँट'च्या फॉर्म्युल्या प्रमाणे मिळणाऱ्या अनुदानामुळे व विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे हे संकट ओढवलेले होते.

**१३.३** शैक्षणिक आकृतिबंधाच्या पुनर्रचनेने हे जे संकट महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणक्षेत्रावर आले त्यातून बाहेर पडण्यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला फार मोठा आटापिटा करावा लागला. एका बाजूला न्यायालयात हा संघर्ष चालला व दुसऱ्या बाजूला रस्त्यावर सुद्धा हा संघर्ष झाला. परिणामी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांना पंधरा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. पण अशी पुनर्रचना होतांना आलेले संकट परतवून लावण्यासाठी काही महत्त्वाचे बदल करण्यास महासंघाने त्यावेळेच्या शासनास भाग पाडले. ते बदल पुढीलप्रमाणे :-

(१) शैक्षणिक आकृतिबंधात अधिक दोनचे वर्ग हे विद्यालयातील वरिष्ठ वर्ग असतील असे नमूद असले तरी उपलब्ध साधनसामुग्रीची स्थिती लक्षात घेता हे वर्ग महाविद्यालयातून सुद्धा राहतील अशी व्यवस्था अस्तित्वात आली.

(२) महाविद्यालयात अतिरिक्त झालेल्या शिक्षकाला जरी कनिष्ठ महाविद्यालयावर काम देण्यात आले असले तरी त्याचे वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक म्हणून वेतन संरक्षित केले जाईल अशीही व्यवस्था अस्तित्वात आली.

***( सहपत्र दोन : परिच्छेद १४ (३) पहा )***

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
(Ministry of Education, Govt. of India)
**Prof.Manish R.Joshi, Secretary**
D.O. No. 9-2/2025(CPP-II)(C.161349)
29th April, 2025

**Subject:** Curriculum Revision of all academic programmes offered by Universities-reg.

आदरणीय महोदया/महोदय,

In a world evolving at an unprecedented pace, where conceptual innovations and technological advancements are frequently reimagined and upgraded shortly after their introduction, it is imperative that our educational systems keep pace. In this dynamic landscape, the responsibility to address the emerging challenges and opportunities rests with educational leaders, classroom teachers. academic administrators, and community stakeholders alike.

The National Education Policy (NEP) 2020 strongly emphasizes the urgent need for a comprehensive overhaul of the curriculum. Its vision is to make education more holistic, flexible, and aligned with the demands of the 21st century. It calls for a paradigm shift-from rote memorization to conceptual understanding, critical thinking, creativity, and multidisciplinary learning. The revised curriculum must aim to reduce the content burden, incorporate essential life skills, and promote experiential, hands-on learning.

One of the most impactful strategies for staying ahead in the evolving educational ecosystem is the regular and thoughtful revision of academic curricula. This ensures that the content delivered remains relevant, up-to-date, and responsive to the needs of students and society at large.

In view of the above, you are hereby requested to prioritize this matter and initiate immediate steps to ensure that the curricula of all programs offered by your university-and its affiliated colleges-are thoroughly reviewed, revised, and readied for prompt implementation. Additionally, it is also requested to consider key documents published by the University Grants Commission (UGC) in alignment with the National Education Policy (NEP) 2020 during the curriculum revision process. These include, but are not limited to, the National Credit Framework, the National Higher Education Qualification Framework, the Curriculum and Credit Framework for Undergraduate Programmes, embedding Skilling in Academics through Short-term Skill Modules, Apprenticeship Embedded Degree Programmes, Internships and the Curriculum and Credit Framework for Postgraduate Programmes.

सादर,

भवदीय,
(मनिष जोशी)

सेवा में, सभी विश्वविद्यालयों के कुलपति : सभी महाविद्यालयों के प्राचार्य

***घटक राज्यांना याबाबतीत काहीच अधिकार नाहीत असे गृहीत धरून राष्ट्रीय धोरणाची बांधणी करण्यात आलेली आहे.***

*(परिच्छेद ९ पहा)*

(३) तात्पुरत्या काळासाठी का होईना पण वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना देण्यात येत असलेली ३००-६०० ही वेतनश्रेणी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना सुद्धा सर्वत्र लागू करण्याची व्यवस्था अस्तित्वात आली.

आज आता समोरून आलेल्या २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उपलब्ध साधनसामुग्रीचा कसा वापर होईल? याबाबतचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही.

**१४. उच्च शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा केंद्रस्थ नियामक यंत्रणेची स्थापना, कार्य व अधिकार हा आहे.** भारतीय संविधानाच्या केंद्रसूचीतील ६६ व्या क्रमांकावर असलेल्या विषयाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आतापर्यंत, विद्यापीठ अनुदान आयोग, बार कौन्सिल ऑफ इंडिया, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया, सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन इत्यादी सारख्या नियामक संस्थांची केंद्रशासनाने निर्मिती केली असून त्या सर्वांना रेग्युलेशन करण्याचे अधिकार कायद्याने प्रदान केलेले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग सोडून इतर सर्व संस्थांनी नियामक यंत्रणा या नात्याने चांगलाच दबदबा निर्माण केलेला आहे व रेग्युलेशनच्या बंधनकारकतेचा वापर करून शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी उत्तम खटपट केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाची परिस्थिति याबाबतीत मुळीच समाधानकारक नाही ही गोष्ट उघड आहे. आता तर **त्या सर्व संस्था मोडित काढून त्यांच्या जागी National Higher Education Regulatory Council (NHERC) स्थापित करण्याचा प्रस्ताव नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिच्छेद १८.३ मध्ये नमूद आहे.** सन २०२० मध्ये हे धोरण जाहिर झाले असले तरी गेल्या पाच वर्षात ही NHERC स्थापन झालेली नाही. **उच्च शिक्षणापुरते बोलायचे झाल्यास त्यामुळे मोडित निघू घातलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाने कसेबसे हे काम सांभाळले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग मोडित निघणार ही गोष्ट सन २०२० पासून समोर आली पण तत्पूर्वी सुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाचा केंद्रीय नियामक यंत्रणा या नात्याने असलेला इतिहास हा काही फारसा गौरवास्पद नाही.** १९५६ च्या कायद्याच्या कलम २६ अन्वये रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला बहाल करण्यात आलेले आहेत. या अधिकाराचे काळजीपूर्वक विश्लेषण करावयाचे झाले तर हे अधिकार पुढीलप्रमाणे नमूद करता येतील. :-

**(१) शिफारशींच्या स्वरूपाचे रेग्युलेशन :** भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये एकदम संबंध देशभर सक्तीचे रेग्युलेशन करणे हे एखाद्या वेळेला शक्य होणार नाही, व्यावहारिक होणार नाही असे वाटल्यावरून विद्यापीठ अनुदान आयोगाला १९५६ च्या कायद्याने शिफारशींच्या स्वरूपाचे रेग्युलेशन प्रख्यापित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. सन १९५६ मध्ये स्थापन झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे शिक्षकीय पदासाठी नेट-सेट पात्रता धारण करण्याविषयीचे १९९१ चे रेग्युलेशन हे शिफारशीच्या स्वरूपाचे आहे असा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने सन १९९४ मध्ये राजसिंग विरुद्ध दिल्ली विद्यापीठ या प्रकरणामध्ये दिला.

**(२) सक्तीच्या स्वरूपाचे रेग्युलेशन :** सर्वोच्च न्यायालयाने "**तुमचे हे १९९१ चे रेग्युलेशन शिफारशीच्या स्वरूपाचे आहे**" असा निकाल दिल्यामुळे नेट-सेटची पात्रता सक्तीच्या स्वरूपाची करणारे कायद्यातील अधिकार वापरून रेग्युलेशन काढण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने सात-आठ वर्षे लावलीत व त्यानंतर एप्रिल २००० मध्ये त्याप्रकरणी सक्तीचे रेग्युलेशन निर्गमित केले.

**(३) मोघम अशा मंगलवचनांचा मुबलक मारा :** शिफारशीच्या स्वरूपाचे किंवा सक्तीच्या स्वरूपाचे **रेग्युलेशन करण्याचा हा अधिकार १९५६ च्या कायद्यान्वये देण्यात आलेला आहे. कायद्याने अधिकार दिलेला असो अथवा नसो मोघम अशा मंगलवचनांचा मुबलक मारा करण्याचा अधिकार जसा इतरांना असतो तसा तो विद्यापीठ अनुदान आयोगसुद्धा अनेकदा वापरत असते.** याबाबतचे अगदी ताजे उदाहरण सांगावयाचे झाल्यास ते दिनांक २९ **एप्रिल २०२५** च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परिपत्रकाचे (D.O.No. 9-2/2025 (CPP-II) (C.161349)) सांगता येईल. **(सहपत्र : दोन)** त्यातील अनेक मंगलवचने पुढीलप्रमाणे :-

विद्यार्थ्यांवरील विषयांचे ओझे कमी होण्यासह जीवनोपयोगी कौशल्यांचा समावेश, कृतीशील शिक्षणास चालना मिळण्यासाठी अभ्यासक्रमांचे नियमित आणि विचारपूर्वक अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे. देशभरातील विद्यापीठे, महाविद्यालयांना अभ्यासक्रमांमध्ये बदल करून त्यांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) या परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांवरील विषयांचे ओझे कमी होण्यासह जीवनोपयोगी कौशल्यांचा समावेश, प्रत्यक्ष अनुभवाधिष्ठित, कृतीशील शिक्षणास चालना मिळण्यासाठी अभ्यासक्रमांचे नियमित आणि विचारपूर्वक पुनरावलोकन, अद्ययावतीकरण करणे, आजचा काळ अतिशय वेगाने बदलणारा आहे. संकल्पनात्मक नवकल्पना, तंत्रज्ञानातील प्रगती सतत विकसित होत आहे. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक प्रणालीही या गतीशी सुसंगत असणे अत्यंत आवश्यक आहे. या नव्या आव्हानांना आणि संधींना सामोरे जाण्याची जबाबदारी शैक्षणिक नेते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी तसेच समाजातील सर्व घटकांवर आहे. **राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अभ्यासक्रमात व्यापक आणि मूलभूत बदलांची गरज अधोरेखित करते.** या धोरणात शिक्षणाला लवचिक आणि २१ व्या शतकाच्या गरजांशी सुसंगत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**१५.** भारतीय संविधानाच्या पहिल्या सूचीतील (केंद्रसूची) ६६ व्या क्रमांकावर असलेल्या अधिकाराचा वापर करून नियामक यंत्रणांची या राष्ट्रीय धोरणाने तयार केलेली निती सुद्धा याबाबतीत लक्षात घेणे आवश्यक आहे. "light but tight" regulation by a single regulator for higher education;" अशा शब्दात नियामक यंत्रणेचे वर्णन या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिच्छेद 9.3 (h) मध्ये करण्यात आलेले आहे. केंद्र स्तरावर नियामक यंत्रणा म्हणून काही मंडळाची स्थापना झालेली नसली तरी घोषणा झालेली असल्यामुळे आज विद्यापीठ अनुदान आयोगाची परिस्थिति ही मोडित निघू घातलेल्या यंत्रासारखी किंवा यंत्रणेसारखी झालेली आहे आणि त्याचा परिणाम हा त्यांच्या कार्यशैलीवर होत आहे. याची काही मोजकी उदाहरणे पुढीलप्रमाणे :-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा गाजावाजा सुरू होण्यापूर्वीच सन २०१८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने रेग्युलेशन २०१८ प्रख्यापित केले असून ते १८ जुलै २०१८ च्या गॅझेट ऑफ इंडिया मध्ये प्रकाशित करण्यात आले. त्याची सुरुवातच पुढीलप्रमाणे आहे :-

"No. F.1-2/2017(EC/PS).—In exercise of the powers conferred **under clause (e) and (g) of sub-section(I) of Section 26 read with Section 14 of the University Grants Commission Act, 1956 (3 of 1956),** and in supersession of the "UGC Regulations on Minimum qualifications for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education 2010" (Regulation No.F.3-1/2009 dated 30th June, 2010) together with all amendments made therein from time to time, the University Grants Commission, hereby, frames the following Regulations, namely:-"

कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमान्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून आपण हे रेग्युलेशन निर्गमित करीत आहोत याचा स्पष्ट उल्लेख येथे आहे. मात्र मोघम मंगलवचनांचा मुबलक मारा करतांना आपण तो कोणत्या कायदेशीर अधिकारान्वये करीत आहोत याचा उल्लेख मात्र विद्यापीठ अनुदान

***"सर्व जर तुम्हीच ठरविणार आहात तर मग आम्ही एक रुपयाचासुद्धा आर्थिक भार उचलणार नाही" अशी भूमिका अनेक राज्यांकडून समोर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याबाबतीत या राष्ट्रीय धोरणाने कोणताही विचार केलेला नाही हे खेदजनक होय.***

*(परिच्छेद १२.३ पहा)*

***शैक्षणिक आकृतिबंधाची रचना* (structure), *कालावधी* (duration) *यापेक्षा उपलब्ध साधनसामग्रीचा उत्तम उपयोग करून घेणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट शिक्षण आयोगाच्या अहवालामध्ये मांडलेली आहे.***

*(परिच्छेद ५ पहा)*

आयोगाच्या दिनांक २९ एप्रिल २०२५ च्या पत्रकात नाही.

**१६.** आपल्याला हे अधिकार कोठून मिळालेले आहे हे नमूद करण्याची पद्धतीच नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे संपुष्टात आणली जात आहे. सर्व स्तरावर "राष्ट्रीय धोरण २०२० नुसार आपण हे करीत आहोत" एवढे वेदवाक्य सुरुवातीला नमूद केले की, पुढे मोघम मंगलवचनांचा मुबलक मारा करण्याचा अधिकार प्रत्येकालाच मिळतो. ताजे उदाहरण द्यायचे तर राज्य अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण २०२४-सादर करतांना सुरुवातीलाच संचालकांनी नमूद केलेल्या मनोगतातील पहिलेच वाक्य पुढीलप्रमाणे आहे:-

**"राज्य अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण, आपणा सर्वांसमोर सादर करताना सुकाणू समिती सदस्य सचिव तथा संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या नात्याने मला विशेष आनंद होत आहे."**

**कोणत्या कलमान्वये दिलेल्या कोणत्या अधिकारांन्वये आपल्याला हा विशेष आनंद होत आहे हे त्यांनी नमूद केलेले नाही. त्यामुळेच पुढे कुणी तरी त्यांनी शिफारस केलेली नसतांना त्यांच्या नावावर प्राथमिक शिक्षणात हिंदी सक्तीची करून टाकणारा शासननिर्णय काढला. त्यानंतर आम्ही अशी शिफारस केलेली नाही. "तो मी नव्हेच" असे खुलासे करीत विशेष आनंद झालेले संचालक वृत्तपत्रांच्या कार्यालयात फिरत होते.**

**१७.** १९५६ च्या कायद्यान्वये सक्तीची व्यवस्था अंमलात आणण्यासाठी देण्यात आलेले अधिकार वापरून विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१८ चे रेग्युलेशन प्रख्यापित केलेले आहे. हे रेग्युलेशन सक्तीचे आहे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे असे विद्यापीठ अनुदान आयोगाने वारंवार कळविले आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह व नुटाचे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी यांना दिनांक २२ मार्च २०२३ रोजी एक पत्र (५४/२३) पाठवून "With reference to your letter dated 24.02.2023 on the subject cited above, I am directed to inform you that **UGC Regulations and its amendments** issued by the UGC from time to time are framed after detailed deliberation by the Expert Committee and in consultation with the MHRD and **are mandatory in nature and cannot be overlooked at any stage and all the Universities/Institutions/colleges have been advised to strictly comply with them without any deviation."** असे कळविले आहे. २२ मार्च २०२३ रोजीचे यूजीसीचे हे पत्र सोबत **सहपत्र : तीन** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**(A)** २०१८ च्या या रेग्युलेशनमध्ये परिच्छेद १९.१ पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

**"19.1 Incentives for Ph.D./M.Phil. and other Higher Qualification : (i)** Five non-compounded advance increments shall be admissible at the entry level of recruitment as Assistant Professor to persons possessing the degrees of Ph.D. awarded in a relevant discipline by the University following the process of admission, registration, course work and external evaluation as prescribed by the UGC. **(ii)** M.Phil degree holders at the time of recruitment to the post of Assistant Professor shall be entitled to two noncompounded advance increments."

**(B)** याच २०१८ च्या रेग्युलेशनमध्ये परिच्छेद १३ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

**"13.0 Appointments on Contract Basis :** The teachers should be appointed on contract basis only when it is absolutely necessary and when the student teacher ratio does not satisfy the laid-down norms. In any case, the number of such appointments should not exceed 10% of the total number of faculty positions in a College/University. The qualifications and selection procedure for appointing them should be the same as those applicable to a regularly-appointed teacher. The fixed emoluments paid to such contract teachers should not be less than the monthly gross salary of a regularly appointed Assistant Professor."

इतर अनेक तरतुदींसह या दोनही तरतुदींची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याच्या अनेक तक्रारी आल्या तरी विद्यापीठ अनुदान आयोग काहीच कारवाई करीत नाही. **सक्ती करण्याची शक्ती कायद्याने दिलेली असतांना ज्यांना Tight करता आले नाही ते Light but Tight च्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या काळात काय करतील याची कल्पना करता येते.**

**१८.** या सर्व वादावादीमध्ये भारतीय संविधानाची मूळ संरचना (Basic

*( सहपत्र तीन : परिच्छेद १७ पहा )*

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

(Ministry of Education, Govt. of India)

Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002

सत्यमेव जयते

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

www.ugc.ac.in Phone No. 011-23604334

No.F.9-12/2023(PS/Misc.) **Speed-Post** 22 March, 2023

**Dr. P. B. Raghuwanshi,**
President, Nagpur University Teachers' Association, Rajapeth, Amrawati-444 601

**Subject:** Eligibility criteria for CAS promotion of University Teachers from Academic level 13A to Academic Level 14, Extension of Date - Reg.

Sir,

With reference to your letter dated 24.02.2023 on the subject cited above, I am directed to inform you that **UGC Regulations and its amendments** issued by the UGC from time to time are framed after detailed deliberation by the Expert Committee and in consultation with the MHRD and **are mandatory in nature and cannot be overlooked at any stage and all the Universities/Institutions/ colleges have been advised to strictly comply with them without any deviation.**

Yours faithfully,
**(Supriya Dahiya)** Education Officer

***रेग्युलेशन करण्याचा हा अधिकार १९५६ च्या कायद्यान्वये देण्यात आलेला आहे. कायद्याने अधिकार दिलेला असो अथवा नसो मोघम अशा मंगलवचनांचा मुबलक मारा करण्याचा अधिकार जसा इतरांना असतो तसा तो विद्यापीठ अनुदान आयोगसुद्धा अनेकदा वापरत असते.*** *(परिच्छेद १४ पहा)*

Structure) संरक्षित करण्याचा प्रश्न शेवटी शिल्लक राहतोच.

**(A)** मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत काही निर्बंध घालून दिलेले आहेत.

"The theory of basic structure is based on the concept of constitutional identity. The basic structure jurisprudence is a preoccupation with constitutional identity. In *Kesavananda Bharati v. State of Kerala, (1973)* 4 SCC 225: AIR 1973 SC 1461 it has been observed that **"one cannot legally use the Constitution to destroy itself."** It is further observed "the personality of the Constitution must remain unchanged." Therefore, this Court in *Kesavananda Bharati, (1973)* 4 SCC 225: AIR 1973 SC 1461, while propounding **the theory of basic structure,** has relied upon the doctrine of constitution identity."

भारतीय संविधानाच्या कलम ३६८ मध्ये संविधानात सुधारणा (Amendment) करण्याची प्रक्रिया नमूद केलेली आहे. "सुधारणा" या शब्दाचा अर्थ "संविधानाच्या मूळ संरचनेला (Basic Structure) धक्का न लावता करण्यात आलेला बदल" असा मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेला आहे. संविधानाच्या सार्वभौमत्वाचा (Constitutional Sovereignty) स्थापित झालेला हा सिद्धांत या क्षेत्रामध्ये "स्थापित अंतिम स्थिती" मानल्या गेलेला आहे.

**(B)** संघराज्य पद्धतीचे शासन (Federal form of Government) हा संविधानाच्या मूळ रचनेचा गाभा मानल्या गेलेला आहे. भारतीय संविधानातील पहिलेच कलम "India, that is Bharat, shall be a Union of States." असे आहे. "**इंडिया, अर्थात भारत, हा एक राज्यांचा संघ असेल.**" या संविधानातील पहिल्याच कलमातील 'फेडरेशन' या शब्दाचा अर्थ सांगताना मा.सर्वोच्च न्यायालयाने एस.आर.बोम्मई विरुद्ध केंद्रशासन या प्रकरणामध्ये दिलेल्या निकालात "The expression "Federation" or "federal form of Government" has no fixed meaning. It broadly indicates a division of powers between a Central (federal) Government and the units (States) comprised therein." असा सांगितला आहे. संविधानाने राज्यकारभाराचे विषय केंद्रात व राज्यांमध्ये वाटून दिलेले आहेत. अशा स्थितीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासारखा विषय अंमलबजावणीला टाकतांना केंद्रशासनासमोर दोन मार्ग उपलब्ध होते. **पहिला मार्ग असा की,** संविधानाने राज्यांना सुद्धा याबाबतीत काही अधिकार दिलेले आहेत हे लक्षात घेऊन सर्व राज्यांशी चर्चा व विचार विनिमय करून याबाबतीत धोरण निश्चित करणे. पण या मार्गाचा वापर झालेला दिसून येत नाही. **दुसरा मार्ग असा की,** आम्हाला दिलेला अधिकार आम्ही वापरतो, तुमच्या अधिकारावर काही घाला घातल्या जात आहे असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्हाला कोर्टकचेरीचा मार्ग मोकळा आहे अशी भूमिका घेणे. आज तरी निदान दुसऱ्या प्रकारची भूमिका घेण्यात आलेली आहे असे दिसून येते. याचा परिणाम असा होणार की, लहान लहानशा मुद्यांवर दीर्घकाळ न्यायालयीन संघर्ष चालणार व या संघर्षाच्या काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे जे कोणी भरडल्या जातील ते भरडतच जाणार.

**१९.** नियामक यंत्रणांचा संपूर्ण अभाव, कायदेशीररित्या अस्तित्वात असलेल्या पण मोडीत निघू घातलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगासारख्या नियामक यंत्रणांनी सक्ती करण्याच्या विधिमय अधिकारांचा वापर करून काढलेल्या उपविधानांची अंमलबजावणी करण्याबाबत प्रदर्शित केलेली दुर्बलता, मार्गदर्शक समित्या, आराखडा समित्या, सुकाणू समित्या अशा विधिमय अधिकार नसलेल्या अनौपचारिक समित्यांचा सुळसुळाट, पहिल्याच वाक्यात NEP 2020 चा उल्लेख करून अनौपचारिकरित्या सुरू असलेला मोघम मंगलवचनांचा मुबलक मारा, विधिविधान किंवा विधिवतरित्या करण्यात आलेले उपविधान या सारख्या कायदेशीर तरतुदींचा वापर करण्याबाबत संपूर्णपणे उदासिनता, केंद्रापासून तर राज्यापर्यंत काटेकोरपणे अभ्यासक्रमाची बांधणी करून अंमलबजावणी करण्याबाबतसुद्धा उदासिनता, विधिविधान किंवा विधिवतरित्या करण्यात आलेले उपविधान या सारख्या कायदेशीर तरतुदींचा वापर करण्याबाबतच्या इच्छेअभावी उद्या होणाऱ्या कोर्टकचेऱ्या, सर्व अनौपचारिक समित्यांकडून वारंवार होत असलेला अनौपचारिक मार्गाचा वापर व त्यातून निर्माण होणारा संभाव्य गोंधळ, परिनियम, अध्यादेश, विनियम, नियम हे अस्तित्वात असलेले उपविधान प्रकार आता इतिहास जमा झालेले आहेत, हे उघडपणे सांगण्याच्या धैर्याचा अभाव, यापुढे कोणत्याही उपविधान प्रकाराचा वापर न करता मोघम मंगलवचनांच्या द्वारेच कारभार करावयाचा आहे अशा स्पष्ट सूचना देण्यातील जोखिम लक्षात आलेली नसणे धोकादायक आहे.

**२०.** अनेक राज्यांनी गोंधळपूर्ण स्थिती निर्माण करणाऱ्या NEP 2020 ची अंमलबजावणी पुढे ढकलली आहे. काही राज्यांनी अंमलबजावणी करण्यास नकार दिलेला आहे. हे लक्षात घेता नव्या शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून काटेकोरपणे विधिविधान व उपविधानाद्वारे व्यवस्था स्थापित केल्या जात नाहीत तोपर्यंत या धोरणाची अंमलबजावणी स्थगित करण्यात येत आहे असे राज्यशासनाने घोषित करणे हितकारक आहे.

विद्यापीठांनी त्यांच्यावर मुबलक मारा करण्यात येत असलेल्या मोघम मंगलवचनांच्या बाबतीत अंमलबजावणी करतांना अंतिम जबाबदारी ही विद्यापीठावर येणार आहे हे लक्षात घेऊन **(i)** विधिमय बांधणी असलेल्या काटेकोर व रेखीव रचित (formulated) आराखड्याची मागणी करावी व मगच अंमलबजावणी करावी. **(ii)** ते शक्य नसेल तर किमान पक्षी कोणी सक्ती केली म्हणून मोघम मंगलवचनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. याचा स्पष्ट उल्लेख अंमलबजावणीच्या आदेशामध्ये असावा. **(iii)** या दोनही गोष्टी शक्य नसतील तर ढिसाळ अंमलबजावणीमुळे निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या असंतोषाला तोंड देण्याच्या इतर मार्गांचा विचार करावा अशी सूचना करण्यात येत आहे. रेखीवपणाच्या अभावासह ढोबळमानाने अरचित (unformulated) अशा मोघम मंगलवचनांचा मुबलक मारा करून व्याख्यान देणे ही तुलनेने सोपी गोष्ट आहे. मात्र शेकडो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सामोरे जातांना अभ्यासक्रमाचा नियमांनी बांधलेला रेखीव व रचित (formulated) आकृतिबंध सोबत घेऊनच समोर जावे लागते. अशा आकृतिबंधाशिवाय समोर जाणे धोकादायक आहे, या गोष्टीचा संपूर्णपणे विसर पडण्याची फार मोठी किंमत मोजावी लागते हे या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक शिक्षकाला ठाऊक आहे.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 08.06.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.06.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................